# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### क्रीडा विभाग

लोकमत

# शरीरसंपत्तीचे जतन करणे आवश्यक : ॲड. बुट्टेपाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर** : बदलत्या जीवनशैलीमुळे शरीराकडे दुर्लक्ष होत चालले आहे. शरीरसंपत्ती अनमोल असून, तिचे जतन करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती अंतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव (मुले) स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी, संचालक बाळासाहेब सांडभोर, जिल्हा क्रीडा समिती सचिव डॉ. गिरीश ढमाले, सहसचिव डॉ. पांडुरंग लोहटे, प्रा. डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. प्रतिमा लोणारी आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील एकूण १५ महाविद्यालयांतील ४८ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. वेटलिफ्टिंग स्पर्धा ५५ किलो, ६१ किलो, ६७ किलो, ७३ किलो, ८१ किलो, ८९ किलो, ९६ किलो व १०९ किलो वजनी गटात घेण्यात आली. यात अनुक्रमे नीरजकुमार यादव, ह्रषीकेश पाटील, नितीन वाळुंज, संदीप वाडेकर, ऋतुराज गायकवाड, चिराग वाघावले, नितीन होळकर, कुणाल पाटील, अमित वाळुंज यांनी प्रथम क्रमांक पटकावला. पिंपरीच्या महात्मा फुले महाविद्यालयाचा ह्रषीकेश चव्हाणला बेस्ट लिफ्टर पुरस्कार देण्यात आला. तर वेटलिफ्टिंग स्पर्धेचे सांघिक विजेतेपद राजगुरु महाविद्यालयाने पटकावले.

शरीरसौष्ठव स्पर्धाही ६० किलो वजनी गटापासून ९० किलोपर्यंत विविध वजनी गटात घेण्यात आली. यामध्ये सनी थोरात, आदित्य गोळे, रोहन टेकावडे, श्रेयस कुलथे, प्रणेश कारभारी, साहिल राठोड, संकेत काळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. एमएमआयटी महाविद्यालयाचा रोहन टेकावडे यास बेस्ट पोझर पोरितोषिकाने गौरविले. या स्पर्धेचे पंच म्हणून सुधीर म्हाळसकर, प्रा. अनिल मरे, डॉ. शिवाजी भिंताडे यांनी काम काम पाहिले

Hello Pune Gramin
Page No. 7 Sep 23, 2019
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख